


मधुबाला-दिलीपकुमारः नैन मिले नैन हुए बावरे...

तराना : दिलीपकुमारने नाईलाजाने स्वीकारला



तलत महमूद

दिलीपकुमारने भूमिका आवडली नाही म्हणून नाकारलेला *तराना*चा प्रस्ताव कोणत्या नाईलाजास्तव स्वीकारला?

□ इसाक मुजावर

दिलीपकुमारची पहिली लोकप्रिय नायिका म्हणून कामिनी कौशल हिचं नाव घेतलं जातं. तिच्यापाठोपाठ दुसरा नंबर लागतो मधुबालाचा. १९५१चा कृष्ण मुव्हीटोनचा *तराना* त्या दोघांचा पहिला चित्रपट. त्याआधी १९४४साली बॉम्बे टॉकीजच्या *ज्वार भाटा*तून दिलीपकुमार चित्रपटात आला. साठ व सत्तरच्या दशकात हिंदी चित्रपटात आईची भूमिका करणारी अभिनेत्री मृदुला त्याची नायिका होती आणि मधुबाला बालतारका होती. तिच्याबरोबरच किशोरकुमारची भूतपूर्व पत्नी, अमितकुमारची आई रुमादेवीदेखील बालतारका म्हणून यात चमकली.

१९४७च्या केदार शर्मांच्या *नीलकमल*मध्ये राज कपूरबरोबर मधुबाला नायिका म्हणून पहिल्यांदा चमकली आणि दिलीपकुमारची नायिका म्हणून *तराना*पासूनच तिच्या रुपेरी जीवनाची वाटचाल सुरू झाली. *तराना*च्या आधी निर्माते-दिग्दर्शक महेश कौल यांनी त्या दोघांना घेऊन एक चित्रपट सुरू केला होता, *हार सिंगार*. दोन चार रीळांच्या चित्रणानंतर तो बंद पडला आणि नंतर सुरू झालेला *तराना* त्यांचा पहिला चित्रपट ठरला.

*तराना*चे निर्माते होते खानचंद श्यामदास तथा के एस. दर्यानी व राम दर्यानी हे दोन बंधू. यापैकी के. एस. दर्यानी लेखक होते. अनेक लोक त्यांना शेक्सपियर ऑफ सिंध म्हणून संबोधायचे. राम दर्यानी दिग्दर्शक होते. *तराना*च्या आधी दिलीपकुमारने त्या दोघांच्या १९४८च्या *घर की इज्जत* या चित्रपटात भूमिका केली होती. तेव्हा दुय्यम अभिनेता म्हणून त्याचा संघर्ष सुरू होता. *घर की इज्जत*मध्ये त्याच्या भूमिकेहून दीक्षित व गोप या हास्य अभिनेत्यांची भूमिका अधिक महत्त्वपूर्ण होती आणि नायक असूनही त्याची भूमिका तशी दुय्यम होती, पण तेव्हा तो तसा चोखंदळ झालेला नव्हता.

*तराना*च्यावेळी मात्र ही परिस्थिती बदलली होती. कोणताही चित्रपट स्वीकारताना त्यातील आपल्या भूमिकेचा तो आधी विचार करू लागला होता. एकावेळी एक वा दोनपेक्षा अधिक भूमिका स्वीकारणंदेखील तेव्हा त्याने बंद करून टाकलं होतं. *तराना*चा प्रस्तावही कथा व आपली भूमिका न आवडल्याने सुरुवातीला त्याने नाकारला होता.

त्याचा नकार ऐकून त्याच्या घरातून बाहेर पडत असताना संवाद राम दर्यानी यांच्या कानावर एक संवाद पडला. दिलीपकुमारचा कॉलेजमध्ये शिकणारा भाऊ त्याच्याकडे कॉलेजची फी भरायला पैसे मागत होता आणि दिलीपकुमार आपल्याकडे पैसे नाहीत असं

भावाला सांगत होता. हे ऐकल्यावर राम दर्यानी दिलीपकुमारच्या घरातून बाहेर पडल्यावर सरळ एका मिठाईच्या दुकानात गेले. तेथे काही मिठाई त्यांनी खरेदी केली. त्या मिठाईबरोबर काही पैसे मिठाईच्याच बॉक्समध्ये घालून ते त्यांनी त्याच्या भावाच्या फीसाठी आपल्यातर्फे भेट म्हणून पाठवले.

दर्यानींनी पाठवलेली ही भेट पाहून दिलीपकुमारचा नाईलाज झाला आणि त्या उपकाराची परतफेड करण्यासाठी *तराना*ची कथा त्याला आवडलेली नसतानाही त्याने होकार दिला. या चित्रपटाबरोबरच मधुबालाबरोबरच्या त्याच्या चित्रपटांचा एक नवा अध्याय सुरू झाला. या चित्रपटादरम्यान त्या दोघांच्यातील जवळीक इतकी वाढली की, मधुबाला आपल्या घरून दिलीपकुमारसाठी जेवणाचा डबा आणू लागली आणि दोघं मिळून तो चवीने ते खाऊ लागले.

श्यामानेही *तराना*मध्ये प्रमुख भूमिका साकारली. १९४५च्या *झीनत*मधील 'आहे न भरी शिकवे तो किये...' या कव्वालीत ती शशीकला व शालिनी यांच्यावरोबर पडद्यावर दिसली होती. त्यानंतर ती एक्स्ट्रांच्या गर्दीत हरवून गेली होती. *तराना*ने तिला या एक्स्ट्रांच्या गर्दीतून बाहेर काढून स्वतःचा चेहरा दिला. जीवन व गोप हे दोघे *तराना*तील सहकलाकार होते. दर्यानींच्या कोणत्याही चित्रपटाचं पान त्या काळात त्या दोघांशिवाय हलायचं नाही. कुमार, गुलाब, देवासकर, विक्रम कपूर, चंदू, गिरधारी *तराना*चे अन्य कलाकार होते.

*तराना*चे संगीतकार होते अनिल विश्वास. दर्यानींशी त्यांचे संबंध फार जुने. १९३५च्या दर्यानींच्याच *जंटलमन डाकू*ला अनिल विश्वासनी संगीत दिलं होतं. जन्माने ते बंगाली, तरीही *जंटलमन डाकू*च्यावेळी राम दर्यानींच्याकडून ते आवडीने सिंधी भाषा शिकायचे. त्या काळातील सिंधी अभिनेत्री आशालता हिच्याशी परिचय वाढवण्यासाठी. आशालताबरोबर अनिल विश्वास यांचा विवाहही झाला, पण तो सुखाचा ठरला नाही. तिच्यानंतर पार्श्वगायिका मीना कपूर त्यांच्या जीवनात आली. आशालताला घटस्फोट देऊन त्यांना तिच्याशी विवाह केला आणि १९६५च्या *छोटी छोटी बाते* नंतर चित्रपट व्यवसाय व मुंबईकडे पाठ फिरवून मीना कपूरबरोबरचा आपला संसार त्यांनी दिल्लीला थाटला. अधून-मधून कधीतरी ते मुंबईला येत. असेच एकदा ते मुंबईला आले होते. राम दर्यानींना हे कळलं तेव्हा त्यांनी अनिलजींना फोन लावला आणि सवयीने सिंधीत बोलायला सुरुवात केली. आशालता जीवनातून निघून गेल्यावर सिंधी भाषेचा त्यांचा सराव काहीसा सुटल्यासारखा झाला होता. यामुळे ते काहीसे गोंधळून गेले आणि फोनवर सिंधी भाषा ऐकून ते म्हणाले, आपण काय बोलताय हे मला कळत नाही.

यावर दर्यानींनी अनिल विश्वास यांची फिरकी घेत त्यांना उत्तर दिलं, आशालतावर प्रेम करताना तू माझ्याकडूनच सिंधी शिकत होतास. आता आशालतावरोबर सिंधी भाषेचा देखील तुला विसर पडलेला दिसतोय.

ज्वार भाटा या दिलीपकुमारच्या पहिल्या चित्रपटाचे संगीतकार अनिल विश्वास होते. नरगीसबरोबरचा त्याचा पहिला चित्रपट *अनोखा प्यार*ला अनिल विश्वास यांचच संगीत होतं. *आरजू* कामिनी कौशलबरोबरचा त्याचा शेवटचा चित्रपट. त्यालाही अनिल विश्वास यांचंच संगीत होतं. मधुबालाबरोबरचा पहिला *तराना*चे संगीतकार अनिल विश्वासच होते. त्यांच्या संगीतातच दिलीपकुमार *आरजू*मध्ये तलत महमूदच्या आवाजात सर्वात प्रथम गायला आणि त्यानंतर पुन्हा *तराना*त. या चित्रपटातील तीन गाण्यात तलतचा आवाज होता. या तीन गाण्यांपैकी 'जली जो शाखे चमन, एक मैं हूं एक मेरी...' हे गाणं तलतचं सोलो गाणं होतं. आणि या गाण्याचं वैशिष्ट्य हे होतं की, राम दर्यानींनी हे गाणं कॅमेऱ्याच प्लेसिंग एकाच जागी करून एकाच शॉटमध्ये चित्रीत केलं होतं. 'नैन मिले नैन हुए बावरे...' व 'सीने में सुलगत है अरमां...' ही दोन गाणी तलतने लताबाईंच्यावर गायली होती व ती दिलीपकुमार-मधुबाला या दोघांच्यावर चित्रित करण्यात आली.



लता मंगेशकर



अनिल विश्वास



श्यामा

त्या काळी नायिकेच्या वाट्याला अधिक गाणी यायची. *तराना*त दिलीपकुमारहून मधुबालाच्या वाट्यालाच अधिक गाणी आली होती. यामुळे लताबाईंचा आवाज या चित्रपटातील आठ गाण्यात ऐकू आला होता. या आठ गाण्यांपैकी दोन गाणी लताबाईंनी तलतबरोबर गायली होती. आणि 'बोल पपिहे बोल कौन है मेरा चितचोर...' हे गाणं संध्या मुखर्जीबरोबर. संध्या सुरुवातीला बंगाली चित्रपटातून गायची. मुंबईत तिने पहिलं गाणं गायलं एस. डी. बर्मन यांच्या संगीतात *सजा*मध्ये आणि त्यानंतर अनिल विश्वास यांच्या संगीतात *तराना*त 'यू छुप के मेरा आना...', 'मोसे रूठ गये मोरे सावरियां...', 'बेईमान तोरे नैनवा निंदिया न आये...', 'वापस ले लो ये जवानी...' व 'वो दिन कहां गये बता...' ही या चित्रपटातील पाच गाणी लताबाईंची सोलो गाणी होती. यापैकी 'वापस ले लो ये जवानी...' हे गाणं कैफ इरफानीनी लिहिलं होतं व लताबाईंची इतर गाणी डी. एन. मधोकनी. लता व तलत यांची दोन गाणी प्रेमधवननी लिहिली होती व तलतचं सोलो गाणं कैफ इरफानीनी.